अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः ससेनि-३२१७/प्र.क्र.६१/१७/तांशि -७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०८ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ : १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.१५ (२)(१९३)/१२२४२/सात-अ, दि. ११ डिसेंबर,२०१५ व दि.१५ एप्रिल, २०१७ चे पत्र.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे समक्रमांकाचे शासन निर्णय दि. २६ जुलै, २०१६, दि.२७ ऑक्टोबर, २०१६, दि.२७ सप्टेंबर, २०१७ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२० ऑक्टोबर, २०१६.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दि.१५ जून, २०१७.
४) संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दि. ३१ जुलै, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.११ डिसेंबर, २०१५ च्या पत्राद्वारे एकुण ५१ उमेदवारांची अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर शिफारस केलेली आहे. सदर उमेदवारांना संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयाद्वारे नियुक्ती देण्यात आली. त्यापैकी काही उमेदवार सदर पदावर रूजू झाले नसल्याने, त्या उमेदवारांच्या ऐवजी प्रतिक्षायादीतील उमेदवारांची प्रवर्गनिहाय शिफारस करण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास विनंती करण्यात आली. सदर विनंती विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१५ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये प्रतिक्षायादीतून प्रवर्गनिहाय एकूण १५ उमेदवारांची शिफारस केलेली आहे. त्यापैकी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२७ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे १३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून उर्वरित ०२ पैकी ०१ उमेदवारास नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१५ एप्रिल, २०१७ च्या पत्राद्वारे प्रतिक्षायादीतील एकूण १५ उमेदवारांची अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर प्रवर्गनिहाय शिफारस केलेली आहे. त्यापैकी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२७ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे १३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून उर्वरित ०२ पैकी खालील उमेदवाराची त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ०४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी ते ज्या दिनांकास त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

अ. क्र.	आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नांव	आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग	नियुक्तीचे ठिकाण
१	२	३	४
१	श्रीमती राठोड वैशाली राजेंद्र	अ.ज.	शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ

०२. उपरोक्त उमेदवारास वैदयकीय मंडळाने वैदयकीय दृष्टया शासकीय सेवेस पात्र ठरविले आहे तशी नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

०३. उपरोक्त उमेदवाराचा चारित्र्य पडताळणी अहवाल व साक्षांकन नमुना पोलीसांकडून प्राप्त झाला असून त्यांच्या विरूद्द कोणताही दंड व शिक्षा असलेबाबतची नोंद आढळून येत नसल्याचे कळविले आहे.

०४. उपरोक्त उमेदवाराची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षा यादीतून शिफारस केली आहे परंतु त्यांचे गुणवत्ता क्रमांक कळविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आयोगाने त्यांचे गुणवत्ता क्रमांक कळविल्यानंतर त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल. तोपर्यंत त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार जेष्ठतेबाबत कोणताही निर्णय घेण्यात येऊ नये.

०५. उक्त नमूद उमेदवाराची अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१) सदर उमेदवाराची वेतनश्रेणी रु. १५,६००-३९,१००/- या पे बँड व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसपीसी-२०१०/ (३४/१०)/तांशि-२ दि. २०/०८/२०१० मध्ये नमुद एजीपी मध्ये राहील.

२) सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३) सदर उमेदवारास प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) सदर उमेदवाराचे परिवीक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.

५) शिफारसपात्र उमेदवाराचे जाती विषयक दावे संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून / संबंधित प्राधिका-याकडून तपासून घेण्यात यावेत.

६) सदर उमेदवाराची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

७) सदर उमेदवाराचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

८) उपरोक्त उमेदवाराने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत शासनास काहीही कळविले नाही तर, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि. १८/०८/२००९ मधील तरतुदीनुसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत

असलेल्या शासकीय कर्मचा-यांने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्य सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधीत शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील.दि. १८/०८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचा-यास नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू ठरतील.

१०) सदर उमेदवाराचे सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

११) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१२) सदर उमेदवाराने नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसुचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

०६. प्रस्तुत पदाकरीता आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या तरतूदीनुसार उमेदवाराने पदवीस्तरावर किमान प्रथम श्रेणी धारण करणे आवश्यक आहे. तथापि, UGC व AICTE च्या धोरणानुसार काही विद्यापीठे / स्वायत्त संस्थाकडून उमेदवारांना Class ऐवजी Grade देण्यात येते. अशा उमेदवाराची पदवी सेवा प्रवेश नियमानुसार First Class किंवा Equivalent आहे याची खातरजमा संबंधित संस्था प्रमुखांनी करूनच उमेदवारास रूजू करून घ्यावे.

०७. सदर नियुक्ती उमेदवारानी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबुन राहील. सदर प्रमाणपत्र नियुक्ती नंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०८. हे आदेश प्राप्त होताच संबधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबधित संस्थाप्रमुखाकडे सादर करावा. संस्थाप्रमुखांनी त्याबाबतचा अहवाल संचालकामार्फत शासनास सादर करावा.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०९११४७५००४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya
Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2017.11.09 11:35:28 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित उमेदवार (e-mail द्वारे)

प्रत,

१) संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे).
३) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
७) प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
(वरील उमेदवारास रुजू करुन घेताना त्यांच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करुन संस्थाप्रमुखांनी स्वत: खात्री करावी व सदर उमेदवारांना हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. तसेच संबंधित संस्थाप्रमुखांनी या आदेशातील ज्या उमेदवारांची नियुक्ती अटीच्या अधिन राहुन केली आहे त्या उमेदवारांकडून विहीत मुदतीत या अटीची पुर्तता करुन घेवून त्याबाबतचा कार्यपूर्तता अहवाल संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.)
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ .
१०) निवड नस्ती (तांशि-७).